# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/रापनों/२००९/प्र.क्र.४९(भाग-२)/का.११

नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरु चौक,
मादाम कामा रोड, मुंबई:- ४०० ०३२.
दिनांक: - २५ फेब्रुवारी, २०१३

## आदेश

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए नुसार नगरपालिकांच्या सर्व निवडणूकासाठी मतदार यादया तयार करण्याची आणि अशा निवडणूकांचे आयोजन करण्याच्या कामाचे अधीक्षण, संचालन आणि नियंत्रण करण्याची संविधानिक जबाबदारी राज्य निवडणूक आयोगावर सोपविण्यात आलेली आहे.

आणि ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.एसईसी/आरपीपी/२००९/सीआर-४९/का.११ दि.३१/०३/२००९ च्या आदेशातील (महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९) परिच्छेद ९ मधील तरतुदींनुसार एखादया उमेदवारास नोंदणीकृत राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत केले असल्याचे समजण्यासाठी उक्त आदेशासोबतच्या विहित नमुन्यातील लेखी सूचनापत्र नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे पोहचविणे आवश्यक करण्यात आले होते.

आणि ज्याअर्थी, सन २०१२ मध्ये संपूर्ण राज्यामध्ये मोठया प्रमाणावर घेण्यात आलेल्या महानगरपालिका व नगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुकीच्यावेळी विविध राजकीय पक्षांकडून अशी मागणी करण्यात आली होती की, मोठया प्रमाणावर निवडणूका असल्याने विहित नमुन्यातील सूचनापत्र सर्व उमेदवारांना विहित कालमर्यादेत देता येणे अशक्य असल्याने सूचनापत्र सादर करण्याची मुदत वाढवून देण्यात यावी. सदरची मागणी विचारात घेऊन राज्य निवडणूक आयोगाच्या आयोगाच्या क्र.एसईसी/आरपीपी/२००९/सीआर-४९/का.११ दि.०४/०१/२०१२ च्या आदेशान्वये (ज्याला महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) सुधारणा आदेश, २०११ असे संबोधण्यात आले आहे.) महानगरपालिका, नगर परिषद व नगर पंचायती यांच्या निवडणुकीच्या बाबतीत राजकीय पक्षातर्फे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने सादर करावयाचे जोडपत्र-२ सुधारीत करण्यात आले होते व या सुधारणेनुसार सदर सूचनापत्र नामनिर्देशनपत्र मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडे पोहचविणे आवश्यक आहे अशी तरतूद करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उपरोक्त दि.२४/०१/२०१२ च्या आदेशान्वये विहित जोडपत्र-२ सादर करण्याची मुदत वाढविण्यात आल्यामुळे छाननीनंतर वैधरीत्या नामनिर्देशीत उमेदवारांची यादी प्रसिध्द करताना या यादीमध्ये उमेदवार कोणत्या पक्षाचा आहे हे नमूद करण्यासाठी स्पष्टीकरणात्मक आदेश निर्गमित करणे आवश्यक झाले होते. आणि म्हणून राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.रानिआ/रापनो/२००९/प्र.क्र.४९(भाग-२)/का-११, दि.३१/०१/२०१२ आदेशान्वये स्पष्टीकरणात्मक आदेश देण्यात आले आहेत

आणि ज्याअर्थी, राजकीय पक्षातर्फे निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराचे नामनिर्देशनपत्र छाननी मध्ये वैध ठरल्यानंतर असा उमेदवार विहित जोडपत्र-१ व जोडपत्र-२ उमेदवारी मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करु शकला नाही तर अशा प्रकरणात करावयाच्या कार्यवाही संदर्भात राज्य निवडणूक आयोगाच्या क्र. एसईसी/आरपीपी/२००९सी.आर.४९/का-११, दि.१०/१०/२०१२ च्या आदेशान्वये कार्यपध्दती विहित करुन देण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र नगरपालिका निवडणूक नियम १९६६ मधील नियम १२ मधील राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात येणाऱ्या उमेदवारांना एक सूचक व अपक्ष उमेदवाराने पाच सूचक देण्याची तरतूद आहे अशा परिस्थितीत एखादया उमेदवाराने राजकीय पक्षाचा उमेदवार म्हणून नामनिर्देशनपत्र भरले असल्यास व त्यामध्ये एकच सूचक दिला असल्यास असा उमेदवार जर विहित नमुन्यातील सूचनापत्र देऊ न शकल्यास तो अपक्ष उमेदवार म्हणूनही निवडणूक लढविण्यास अपात्र ठरतो. ही परिस्थिती विहित जोडपत्र-२ सादर करण्यासाठीची मुदत वाढविल्यामुळे निर्माण झालेली आहे. म्हणून पूर्वीप्रमाणेच जोडपत्र-१ व जोडपत्र-२ नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील अशी तरतूद करणे आवश्यक झाले आहे अशा निष्कर्षाप्रत राज्य निवडणूक आयोग आलेला आहे. तसेच राज्य निवडणूक आयोगाच्या उक्त दि.३१/०३/२००९ च्या आदेशासोबत विहित करण्यात आलेल्या सुधारीत जोडपत्र-२ मधील मूळ उमेदवाराने उमेदवारी मागे घेतल्यास पर्यायी उमेदवार त्याची जागा घेईल अशी तरतूद कायम ठेवणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व मुंबई महानगरपालिका अधिनियम (सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्र.३) चे कलम १८अ (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, १९४९ (सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्र.५९) च्या कलम १४ (४) महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४०) चे कलम

१०-अ (४) खालील व इतर सर्व अधिकाराचा वापर करुन राज्य निवडणूक आयोग आता पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

अ) राज्य निवडणूक आयोगाचे १)क्रमांक:-एसईसी/आरपीपी/२००९/सी.आर.४९/ का-११, दि.२४/०१/२०१२, (२) क्रमांक: रानिआ/रापनों/२००९/प्र.क्र.४९(भाग-२)/ का-११,दि.३१/०१/२०१२, व (३) क्रमांक:-एसईसी/आरपीपी/२००९सी.आर.४९/ का-११,दि.१०/१०/२०१२ चे आदेश रद्द करण्यात येत आहेत.

ब) राज्य निवडणूक आयोगाच्या क्र.एसईसी/आरपीपी/२००९/सीआर-४९/का.११ दि.३१/०३/२००९ (महाराष्ट्र निवडणूक चिन्ह (आरक्षण व वाटप) आदेश २००९) च्या आदेशासोबतच्या जोडपत्र-दोन मध्ये अंशत: सुधारणा करण्यात येत असून सुधारीत जोडपत्र-१ व जोडपत्र-२ या आदेशासोबत जोडण्यात आले आहे. यामुळे, **महानगरपालिका व नगरपालिका/नगर पंचायत निवडणुकांकरिता राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवाराने विहित जोडपत्र-१ व जोडपत्र-२ मधील सूचनापत्र नामनिर्देशनपत्र दाखल करावयाच्या अखेरच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत सादर करणे आवश्यक राहील.**

सदर आदेश तात्काळ अंमलात येतील.

राज्य निवडणूक आयुक्त यांच्या आदेशानुसार,

(वि. मा. पानसरे)
सहायक आयुक्त,
राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

प्रति,

सर्व जिल्हाधिकारी
सर्व महानगरपालिका आयुक्त
सर्व नगरपरिषदा/नगर पंचायतींचे मुख्याधिकारी
सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष
राज्य निवडणूक आयोगातील सर्व अधिकारी

( राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/रापनों/२००९/प्र.क्र.४९(भाग-२)/का.११, दि.२५ फेब्रुवारी, २०१३ च्या सोबतचे सहपत्र )

## जोडपत्र १

## राजकीय पक्षांनी पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तींबाबत द्यावयाचे सूचनापत्र.

(केवळ महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या निवडणुकांसाठी लागू)

प्रति,

१) महानगरपालिका आयुक्त,.................................. महानगरपालिका

२) जिल्हाधिकारी, ................................ जिल्हा

३) निवडणूक निर्णय अधिकारी,
प्रभाग क्र. ..............., ................................ महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत निवडणूक

* विषय :- सार्वत्रिक / पोट निवडणूक ................................ महानगरपालिका / नगरपरिषद / नगर पंचायत, जिल्हा ..........................
चिन्ह वाटपासाठी उमेदवारांची नावे कळविण्याच्यादृष्टीने व्यक्तींना प्राधिकृत करणेबाबत.

महोदय,

मी, याद्वारे ............................ हा पक्ष, जो राष्ट्रीय मान्यताप्राप्त पक्ष/ राज्यस्तरीय मान्यताप्राप्त पक्ष/ नोंदणीकृत अमान्यताप्राप्त पक्ष असून, वरील निवडणुकीसाठी सदर पक्षाद्वारे पुरस्कृत केलेल्या उमेदवारांची नावे कळविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तींची नावे खालीलप्रमाणे कळवू इच्छितो :-

| सूचनापत्र पाठविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तीचे नाव / व्यक्तींची नावे | पक्षामध्ये धारण करीत असलेले पद | प्रभाग क्र. .......... ........ महानगरपालिका/नगरपरिषद/ नगर पंचायत याबाबत प्राधिकृत |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | | |
| | | |
| | | |

२. वर नमूद केलेल्या व्यक्तींची / व्यक्तींच्या नमुना स्वाक्षऱ्या खालीलप्रमाणे आहेत :-

(१) श्री. .................................... यांची

नमुना स्वाक्षरी

(अ)...................................... (ब)......................................

(क)......................................

(२) श्री. .................................... यांची

नमुना स्वाक्षरी

(अ)...................................... (ब)......................................

(क)......................................

(३) श्री. .................................... यांची

नमुना स्वाक्षरी

(अ)...................................... (ब)......................................

(क)......................................

आपला विश्वासू,

अध्यक्ष/सचिव.

(शाईची अथवा बॉलपॉईंट पेनची स्वाक्षरी)

पक्षाचे नाव

पक्षाची मुद्रा (सील)

ठिकाण :

दिनांक :

टीप :- सदर सूचनापत्रावर पक्षाचे अध्यक्ष, सचिव अथवा अशी सूचना पाठविण्यास अधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्यांची शाईने अथवा बॉलपॉईंट पेनने स्वाक्षरी केलेली असावी.

( राज्य निवडणूक आयोगाचे क्र.रानिआ/रापनों/२००९/प्र.क्र.४९(भाग-२)/का.११, दि.२५ फेब्रुवारी, २०१३ च्या सोबतचे सहपत्र )

## जोडपत्र २

# राजकीय पक्षातर्फे पुरस्कृत करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे कळविणारे सूचनापत्र (केवळ महानगरपालिका, नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या निवडणुकांसाठी लागू)

प्रति,

१) महानगरपालिका आयुक्त,.................................... महानगरपालिका

२) जिल्हाधिकारी, ................................ जिल्हा

३) निवडणूक निर्णय अधिकारी,

प्रभाग क्र. ............, ...... ........ ........ महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत

विषय :- .................... महानगरपालिका / नगरपरिषद / नगरपंचायत निवडणूक

जिल्हा .... ............... उमेदवार उभे करणेबाबत.

महोदय,

........................... पक्षातर्फे प्रभाग क्रमांक .............. महानगरपालिका/ नगरपरिषद/ नगर पंचायत या सार्वत्रिक / पोट निवडणुकीमध्ये उभे करण्यात आलेल्या उमेदवारांची नावे मी खालीलप्रमाणे कळवू इच्छितो :-

| प्रभागाचे नाव / क्रमांक | मान्यता दिलेल्या उमेदवाराचे नाव | मान्यता दिलेल्या उमेदवाराच्या वडिलांचे / पतीचे नाव | मान्यता दिलेल्या उमेदवाराचा पोस्टाचा पत्ता | मान्यता दिलेल्या उमेदवाराचे नामनिर्देशन छाननीमध्ये रद्द झाल्यास अथवा मूळ उमेदवाराने माघार घेतल्यास त्याची जागा घेणाऱ्या पर्यायी उमेदवारांचे नाव | पर्यायी उमेदवाराच्या वडिलांचे/पतीचे नाव | पर्यायी उमेदवाराचा पोस्टाचा पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| | | | | | | |

आपला विश्वासू,

नाव कळविण्यासाठी प्राधिकृत केलेल्या
व्यक्तीचे नाव व स्वाक्षरी.
(शाईची अथवा बॉलपॉईंट पेनची स्वाक्षरी)

पक्षाचे नाव
पक्षाची मुद्रा (सील)

ठिकाण :
दिनांक :

टीप :- (१) सदर सूचनापत्रावर अध्यक्ष, सचिव अथवा अशी सूचना पाठविण्यास प्राधिकृत केलेल्या पक्षाच्या अन्य पदाधिकाऱ्यांची शाईने अथवा बॉलपॉईंट पेनने स्वाक्षरी केलेली असावी.

(१) सदर सूचनापत्र नामनिर्देशनपत्रे **दाखल करण्याच्या** शेवटच्या दिवशी दुपारी ३.०० वाजेपर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांचेकडे पोहोचविणे आवश्यक आहे.